माहितीचा अधिकार

दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (कर)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/६९/२०१९
दि.१९/०६/२०१९.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (कर), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.**

श्रीम.तिवारी बीना अनिल,
बीना निवास, काजुपाडा गाव,
घोडबंदर, ठाणे ४०११०७. ............अपिलार्थी

जनमाहिती अधिकारी तथा,
कर निरिक्षक, प्रभाग क्र.४ ...............प्रतिवाद

## -: विवेचन :-

श्रीम.तिवारी बीना अनिल यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा कर निरिक्षक, प्रभाग क्र.४ यांचेकडे दि.०६/०५/२०१९ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला

१) मालमत्ता क्र.एम०३००४२३०२००० कोणाच्या नावाने देण्यात आला आहे? मालमत्तेचे क्षेत्रफळ किती आहे? मालमत्तेची नोंद कुठल्या तारखेला झाली? मालमत्तेचा सर्वे नं.इत्यादींची पुर्ण माहिती द्या.

२) सर्वे नं.३८/१, ३८/२, ३९/१, ३९/२, ४०/१, ४०/२, ४१/१, ४२/२ च्या भू. मालकाने प्रशासनाकडे केलेल्या अतिक्रमणाच्या तक्रारीची नक्कल प्रत द्यावी.

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**

माहिती अधिकार अंतर्गत प्रश्न क्र.१ चे उत्तर पुर्ण दिले नसुन प्रश्न क्र.२ चे काही ही उत्तर मिळाले नसल्याने अपिलार्थी यांनी दि.०७/०६/२०१९ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (कर) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**

अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी तथा कर निरिक्षक, प्रभाग क्र.४, यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.१९/०६/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता उपस्थित राहणेबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ.कर/९९/२०१९ दि.१३/०६/२०१९ अन्वये कळविण्यात आले आहे.

सबब, जनमाहिती अधिकारी तथा कर निरिक्षक, प्रभाग क्र.४, व अपिलार्थी अर्जदार सुनावणीस उपस्थित आहेत.

20/6/19

Scanned by CamScanner

१) **<u>अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद</u>**:- माझ्या दि.०६/०५/२०१९ रोजीच्या अर्जानुसार प्रश्न क्र.१ चे पुर्ण उत्तर मिळाले नसुन प्रश्न क्र.२ चे काहीही उत्तर मिळाले नाही.

२) **<u>जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-</u>** अपिलार्थी अर्जदार यांना सु[illegible] माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

## -: <u>निर्णय</u> :-

१) जनमाहिती अधिकारी तथा कर निरिक्षक, प्रभाग क्र.४, यांनी अपिलार्थी अर्जदारास मुद्दा क्र.१ बाबतची माहिती १० दिवसांत विनाशुल्क स्वरुपात देण्यात यावी. तसेच मुद्दा क्र.२ बाबतची माहिती प्रभाग अधिकारी, प्रभाग क्र.६ (अतिक्रमण विभाग) यांचेशी संबंधित असल्याने अपिलार्थी अर्जदाराने सदर माहिती प्रभाग अधिकारी, प्रभाग क्र.६ (अतिक्रमण विभाग) यांचेकडून प्राप्त करुन घ्यावी. वरील निर्देश देऊन अपिल निकाली काढण्यात येत आहे.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

**(दिपक पुजारी)**
**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उपायुक्त (कर)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रति:-**

१) श्रीम.तिवारी बीना अनिल,
बीना निवास, काजुपाडा गाव,
घोडबंदर, ठाणे ४०११०७.

२) जनमाहिती अधिकारी तथा
कर निरिक्षक, प्रभाग क्र.४

३) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (कर) यांचे कार्यालय.

Scanned by CamScanner